# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक १४/०३/२०२६ (शनिवार )

---

## बुटीबोरी पोलीस स्टेशन अंतर्गत आवादा कंपनी येथे पाण्याची टाकी फुटुन झालेल्या दुर्घटने प्रकरणी दाखल गुन्हयाबाबत..

पोलीस स्टेशन बुटीबोरी :— दिनांक १९/१२/२०२५ रोजी सकाळी ११:१५ ते ११:३० दरम्यान बुटीबोरी अंतर्गत नविन एमआयडीसी येथील आवादा कंपनीमध्ये पाण्याच्या टाकीचा स्फोट होवुन दुर्घटना झाली होती. आवादा कंपनीमध्ये ॲल्युमिनिअम पत्र्यांच्या १२२५ KL क्षमतेच्या टाकीची टेस्टींग सुरू असतांना पाण्याच्या प्रेशर मुळे सदर पाण्याच्या टाकीचा स्पोट झाला आहे. सदर दुर्घटनेत ६ कामगारांचा मृत्यु झाला असुन ९ जखमी झाले होते. सदर प्रकरणी मर्ग नोंद करण्यात आली होती. दिनांक २०/०१/२०२६ रोजी Directorate of Industrial Safety and Health Department, Nagpur (DISH) यांच्या कडील प्राप्त अहवाला वरून सदर दुर्घटनेबाबत बुटीबोरी पोलीस स्टेशन येथे कलम १०६ भान्यासं (निष्काळजीपणा मुळे मृत्यूस कारणीभुत होणे ) अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

सदर गुन्हयाच्या तपासात आवादा कंपनी प्रोजेक्ट हेड प्रशांतकोमल अरविंद कुमार आणि गोयल स्टिल टॅक चे प्रोजेक्ट हेड राजेश यादव यांच्या हलगर्जीपणा व निष्काळजीपणामुळे दुर्घटना झाल्याचे तपासात निष्पन्न झाल्याने त्यांना सदर प्रकरणात आरोपी करण्यात आले आहे.

# पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे दाखल गुन्हयातील मेफेड्रोन पावडर अंमली पदार्थाची तस्करी करणाऱ्या पाहीजे आरोपीस केले अटक
# स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

दिनांक ११/०२/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला गुप्त बातमीदाराने दिलेल्या माहीतीच्या आधारे सापळा रचुन पोलीस स्टेशन कळमेश्वर हद्दीतील अमरावती महामार्गावर गौंडखैरी नाक्याच्या जवळ खाजगी बस मधुन एम.डी (मेफेड्रोन) पावडर वजन ७९.८५ ग्रॅम किंमती ३,९९,२५०/—रूपये आणि इतर साहीत्य असा एकुण ४,०४,२५०/— रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला होता. नमुद प्रकरणी पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे कलम ८ (क), २२(क) एन. डी. पी. एस. कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला. नमुद गुन्हयात आरोपी अंशुल नितीन गजभिये रा. नागपुर हा आरोपी असल्याचे निष्पन्न झाले परंतु आरोपी मिळुन आला नव्हता. कळमेश्वर पोलीस सदर गुन्हयाचा तपास करीत असतांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सुध्दा समांतर तपास सुरू केला.

मा. श्री हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सदर गुन्हयात समांतर तपासादरम्यान सदर गुन्हयातील पाहीजे आरोपी अंश उर्फ अंशुल नितीन गजभिये, वय २३ वर्ष, रा. १९८ दत्तात्रय नगर, एम आय टी गार्डन जवळ नागपूर याचे शोधकामी संबंधाने गोळा करण्यात आलेली गोपनीय माहिती तसेच तांत्रिक माहितीचे आधारे गुन्ह्यातील पाहिजे आरोपी हा मालाड मुंबई येथे असल्याचे माहिती प्राप्त झाली होती. यावरून स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने मालाड मुंबई येथे जाऊन स्थानिक पोलिसांचे सहकार्याने पाहिजे आरोपीचा शोध घेऊन दिनांक १४/०३/२०२६ रोजी आरोपीस ताब्यात घेतले. आरोपीचे ताब्यातून १) अँड्रॉइड मोबाईल किंमती १५,०००/— रुपये २) एक किपॅड मोबाईल किंमती १०००/—रुपये असा एकूण १६,०००/—रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. कळमेश्वर पोलीसांनी आरोपीला अटक केली आहे.नमुद आरोपीचा दिनांक १७/०३/२०२६ रोजी पर्यंत पोलीस कोठडी रिमांड मंजुर आहे.

# नागपुर ग्रामीण जिल्हयात लोकअदालत मध्ये १५०९ प्रकरणे निकाली तर १५,७४,४०० रूपायांचा दंड वसुल

नागपुर ग्रामीण जिल्हया अंतर्गत दिनांक १४/०३/२०२६ रोजी आयोजीत महालोकअदालत यशस्वी रित्या पार पडली. नमुद लोकअदालत मध्ये खालील प्रमाणे प्रकरणे निकाली काढण्यात आली.

**नागपुर उपविभागातील सर्व पोलीस स्टेशन मधील** २२६ प्रकरणे निकाली काढून एकूण १७८२००/– रुपये दंड वसुल करण्यात आला आहे. **काटोल उपविभागातील सर्व पोलीस स्टेशन मधील** ३४९ प्रकरणे निकाली काढून एकूण ७१,६००/– रुपये दंड वसुल करण्यात आला आहे.**उमरेड उपविभागातील सर्व पोलीस स्टेशन मधील** एकुण १५६ प्रकरणे निकाली काढून एकूण ३,४४,४००/– रुपये दंड वसुल करण्यात आला आहे.**रामटेक उपविभागातील** सर्व पोलीस स्टेशन मधील एकूण २११ प्रकरणे निकाली काढून एकूण २,८१,६००/– रुपये दंड वसुल करण्यात आला आहे. **कन्हान उपविभागातील सर्व पोलीस स्टेशन** मधील एकूण १३४ प्रकरणे निकाली काढून एकूण १,३०,२००/– रुपये दंड वसुल करण्यात आला आहे. **सावनेर उपविभागातील सर्व पोलीस स्टेशन मधील** एकूण ४३३ प्रकरणे निकाली काढून एकूण ५,६८,४००/– रुपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**वरप्रमाणे कलम २८५ भा.न्या.सं अन्वये (सार्वजनिक ठिकाणी वाहतुकीस अडथळा किंवा धोकादायक रित्या वाहन उभे करणे ) मदयपान करून वाहन चालविणे ड्रंक ॲड ड्राईव्ह च्या कलम १८५, जुगार, महाराष्ट्र पोलीस कायदा, तसेच इतर प्रकरणे असे एकुण १५०९ प्रकरणे निकाली काढण्यात आली आहे.तसेच १५,७४,४०० रूपयांचा दंड वसुल करण्यात आला आहे.**

# जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद ०५ गोवंश जनावरांची सुटका, अरोली पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन अरोली :— दिनांक १३/०३/२०२६ रोजी अरोली पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अरोली ते खात रोडनी अवैधरित्या जनावरांची वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी मौजा वाकेश्वर येथे नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान टोयोटा कार क्र. एम.एच.—३१ सि.व्ही.— ७२२७ चे चालकाने त्याचे ताब्यातील कार भरधाव वेगाने व लोकांचे जिवीतास धोका निर्माण होईल अशा प्रकारे निष्काळजीपणाने चालवित असताना मौजा वाकेश्वर गावाकडे कार वळवुन चालकाने वाहन रोडवर उभे करून पळुन गेला. पंचासमक्ष वाहनाची तपासणी केली असता कारमध्ये ड्रायव्हर सिटच्या मागे ०५ गोवंश जनावरे जख्मी अवस्थेत मिळुन आले. नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अत्यंत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन, शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन, चारा पाण्याची व्यवस्था न करता वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले. पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून टोयोटा कार क्र. एम.एच.—३१/सि.व्ही.— ७२२७ किंमती १,५०,०००/— रूपये आणि ०५ गोवंश जनावरे किंमती ५७,०००/—रूपये असा एकुण २०७०००/— रूपयांचा मुददेमाल जप्त केला आहे.

**नमुद प्रकरणी टोयोटा कार क्र. एम.एच.—३१/सि.व्ही.— ७२२७ कार चालक व मालक यांचेविरूद्ध कलम २८१, १२५ भा.न्या.सं. सहकलम ११(१) (ड) प्राण्यांना निर्दयतेने वाहतुक प्रतीबंधक अधिनियम, सहकलम ५ (अ) (२) (९) महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम, सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

# अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद दोन वाहनासह १२ लाख ५५ हजार ५०० रूपयांचा मुद्देमाल जप्त वडोदा पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन वडोदा :— दिनांक १४/०३/२०२६ रोजी वडोदा पोलीस पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, सोनेगाव राजा शिवारातील रेती घाटातून ट्रॅक्टर ट्रॉलीद्वारे अवैधरीत्या रेतीची चोरटी वाहतुक होत आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीस सोनगाव राजा येथील रेती घाट येथे गेले असता कन्हान नदीचे पात्रातून दोन ट्रॅक्टर क्र. १) आयसर कंपनीचा ट्रॅक्टर एम एच—४०/बी ई— ५५४४ व त्याला लागुल असलेली ट्रॉली एम एच—४०/डी ई— ३३२२ २) सोनालीका ट्रॅक्टर क्र. एम एच—४०/बी जे— ८३३२ व विना नंबरची ट्रॉली मिळून आल्याने वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. ट्रॅक्टर क्र. १) चा **चालक नामे मंगेश सिंधुजी घुरघुसे, वय ३५ वर्ष, रा. सोनेगाव राजा ता. कामठी जि. नागपूर व मालकाचे नाव विचारले असता राहुल त्रिंबक महल्ले, रा. सोनेगाव राजा असे सांगितले.** ट्रॅक्टर क्र. २) चा **चालक नामे विकास क्रिष्णाजी चिखलकार, वय ३७ वर्ष, रा. सोनेगाव राजा, ता. कामठी जि. नागपूर असे सांगितले. त्याचे ताब्यातील** ट्रॅक्टर ट्रॉली बाबत विचारपुस केली असता **महेंद्र आनंदराव ढोले, रा. सोनेगाव याचे** सांगणेवरून रेतीची चोरटी वाहतुक करीत असल्याचे सांगितले. **पोलीसांनी दोन्ही चालकास रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत** विचारपुस केली असता त्यांच्याकडे कोणताही परवाना नसल्याबाबत माहीती प्राप्त झाली. **पोलीसांनी पंचासमक्ष वर नमुद दोन्ही वाहने** १) आयसर कंपनीचा ट्रॅक्टर एम एच—४०/बी ई— ५५४४ किंमती ५,००,०००/—रू. व ट्रॉली एम एच—४०/डी ई— ३३२२ किंमती १,५०,०००/—रू. मध्ये ०१ ब्रास रेती किंमती ५,५००/—रू. एकुण ६,५५,५००/—रूपये २) सोनालीका ट्रॅक्टर क्र. एम एच—४०/बी जे— ८३३२ किंमती ५,००,०००/—रूपये व विना नंबरची ट्रॉली किंमती १,००,०००/—रूपये एकुण ६,००,०००/— असा एकुण दोन्ही वाहनातील १२,५५,५००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.

**नमुद आरोपी नामे १) मंगेश सिंधुजी घुरघुसे, वय ३५ वर्ष, रा. सोनेगाव राजा ता. कामठी जि. नागपूर २) विकास क्रिष्णाजी चिखलकार, वय ३७ वर्ष, रा. सोनेगाव राजा, ता. कामठी जि. नागपूर ३) राहुल त्रिंबक महल्ले, रा. सोनेगाव ४) मिहेंद्र आनंदराव ढोले, रा.**

सोनेगाव  याच्या विरूध्द पोस्टे वडोदा येथे कलम ३०३(२), ४९ भा.न्या.सं सहकलम ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सहकलम ४, २१ खाण खनिज अधिनियम, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान १९८४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



# अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद
# वाहनासह ०९ लाख ०७ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त
# रामटेक पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन रामटेक :— दिनांक १३/०३/२०२६ रोजी रामटेक पोलीस पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, लाल रंगाचा ट्रॅक्टर क्र. एम एच—४०/बी जे— ९२४३ त्याला जोडुन असलेली विना क्रमांकाची ट्रॉलीमध्ये नगरधन कडुन मानापुर कडे अवैधरीत्या रेतीची चोरटी वाहतुक होत आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीसांनी नगरधन येथे नाकाबंदी केली असता एक ट्रॅक्टर क्र. एम एच—४०/बी जे— ९२४३ व विना क्रमांकाची ट्रॉलीसह मिळून आल्याने वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. ट्रॅक्टरचा **चालक नामे रवींद्र आसारामजी बंधाटे, वय २७ वर्ष, रा. नगरधन हा मिळुन आला. पोलीसांनी आरोपी चालकास रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत** विचारपुस केली असता त्याच्याकडे कोणताही परवाना नसल्याबाबत माहीती प्राप्त झाली. **पोलीसांनी पंचासमक्ष वर नमुद वाहन** १) ट्रॅक्टर क्र. एम एच—४०/बी जे— ९२४३ व विना क्रमांकाची ट्रॉली किंमती ९,००,०००/—रूपये २) १.५ ब्रास रेती किंमती ७,०००/— रूपये असा एकुण ९०,७०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.

**नमुद आरोपी चालक रवींद्र आसारामजी बंधाटे, वय २७ वर्ष, रा. नगरधन याच्या विरूध्द पोस्टे रामटेक येथे कलम ३०३(२) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सहकलम ४, २१ खाण खनिज अधिनियम, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान १९८४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या १३ आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद. उमरेड पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन उमरेड :— दिनांक १२/०३/२०२६ रोजी उमरेड पोलीसांना गुप्त बातमीदारां मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, कावरापेठ उमरेड येथे काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस घटनास्थळी पोहचुन धाड टाकली असता **आरोपी नामे १) प्रणय शंकर खवास, वय २५ वर्ष, रा. बायपास उमरेड २. नामदेव फकरू मांढरे, वय ५० वर्ष, रा. गांगापुर उमरेड ३) धिरज किशोर मारसींगे, वय ३० वर्ष, रा. कावरापेठ उमरेड ४) आशिफ सलीम शेख, वय २८ वर्ष, रा. बुधवारीपेठ उमरेड ५) आशय गिरधर तिवाडे, वय ३० वर्ष, गांगापुर उमरेड ६) जग्गु श्रीपद चौधरी, वय ४० वर्ष, रा. गांगापुर ७) राजकुमार कवडुजी वंजारी, वय ३८ वर्ष, रा. गांगापुर उमरेड ०८) नवीन बबनराव हरडे, वय ३४ वर्ष, रा. बुधवारीपेठ उमरेड ०९) आकिब जावेद शेख, वय ३१ वर्ष, रा. ग्रिन शीट उमरेड १०) शुभम विरेंद्र शेंडे, वय ३२ वर्ष, रा. परसोडी उमरेड ११) मोहिन मुस्तफा खान, वय २६ वर्ष, रा. ग्रिन सिटी १२) पवन दिलीप धुळे, वय २४ वर्ष, रा. गांगापुर उमरेड १३) स्वप्नील वसंता चौधरी, वय ३१ वर्ष, रा. बुधवारीपेठ उमरेड** हे ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळतांना जागीच मिळुन आले. आरोपीतांच्या **ताब्यातुन** ५२ ताशपत्ते व नगदी २०,११०/—रूपये असा एकुण २०,११०/—रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. नमुद आरोपीतांविरूध्द पोलीस स्टेशन उमरेड येथे १२ महाराष्ट्र जुगार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## नागपुर ग्रामीण जिल्ह्यातील ७१८ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक १४/०३/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार

गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ७१८ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३३ आरोपी अशा एकुण ६३ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ३८ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे ३१ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २७ आणि पोलीस स्टेशन वेलतुर ३० आरोपी अशा एकुण १२६ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग** :— सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे २९ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ३५ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे २७ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३० आरोपी अशा एकुण १२१ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३१ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे २९ आरोपी, पोलीस स्टेशन वडोदा येथे १२ आरोपी अशा एकुण ७२ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग** :— रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ५० आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३६ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे ३३ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे २६ आरोपी अशा एकुण १४५ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग** :— काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ७६ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ५३ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे ३२ आरोपी अशा एकुण १९१ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**(सर्व ६ उपविभागातील सर्व पोलीस स्टेशन येथे एकुण ७१८ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी**




मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने